महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०२१

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नरडवे, अरुणा आणि देवधर या जलसिंचन पाटबंधारे प्रकल्पातील कालव्याचे व पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१) ५० (०९-०४-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्या धरणांची कामे ५० टक्यांपेक्षा अधिक झाली आहेत अशा धरणांची कामे पूर्ण करण्याचे शासनाचे धोरण असून नरडवे धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासह सर्व प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील अशी ग्वाही मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नरडवे, अरुणा आणि देवधर या जलसिंचन पाटबंधारे प्रकल्पातील कालवे पूर्ण झाले आहेत काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील किती शेतक-यांना धरणातील पाण्याचा लाभ मिळणार आहे व यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच नरडवे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या स्वेच्छा पुनर्वसन व पुनर्वसीत क्षेत्रात नागरी सुविधा उपलब्ध करुन त्यांचे पुनर्वसन करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(४) उक्त प्रकल्पातील कालव्याचे व पुनर्वसनाचे काम पुर्ण झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. नरडवे प्रकल्पांतर्गत कालवे प्रस्तावित नाहीत. धरणाखालील गडनदीवर १४ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे प्रस्तावित असून ११ को. प. बंधारे पूर्ण झाले आहेत. PMKSY माहे जून २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अरूणा प्रकल्पाचे सद्यस्थितीत कालव्याची कामे PDN सहीत प्रगतीपथावर असून १५% कामे पुर्ण झाली आहेत.कालव्यासहीत प्रकल्पाची कामे PMKSY अंतर्गत जून २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. देवघर प्रकल्पाच्या कालव्याची कामे ८०% पूर्ण झाली असून उर्वरीत कामे PDN सहित प्रगतीपथावर आहेत.सुप्रमा मान्यतेनंतर जून २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) नरडवे प्रकल्पामुळे ४८ गावातील १८३४३, अरूणा प्रकल्पामुळे १७ गावातील १७७९२ व देवघर प्रकल्पामुळे १७ गावातील ३१७४२ असे सिंधुदूर्ग जिल्हयातील एकूण ६८०५७ शेतकऱ्यांना धरणांतील पाण्याचा लाभ मिळणार आहे. सन २०२०-२१ वर्षासाठी नरडवे प्रकल्पांसाठी रु.८०.०० कोटी, अरूणा प्रकल्पासाठी-रू.११०.०० कोटी व देवघर प्रकल्पासाठी रु.१०.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. नरडवे प्रकल्पावरील पुनर्वसनाचे काम प्रगतीपथावर असून ८०% पूर्ण झाले आहे.

(४) नरडवे प्रकल्पांतर्गत १४ को.प. बंधाऱ्यांपैकी ११ को.प. बंधारे पूर्ण झाले असून उर्वरीत कामे तसेच अरूणा व देवघर प्रकल्पावरील कालव्याची PDN सह उर्वरीत कामे उपलब्ध निधीनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. देवघर प्रकल्पावरील पुनर्वसनाची कामे पूर्ण झाली असून नरडवे प्रकल्पावरील पुनर्वसनाची कामे ८०% व अरूणा प्रकल्पावरील कामे ९५% पुर्ण झाली असून उर्वरीत कामे उपलब्ध निधीनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा, पेनटाकळी, निम्न वर्धा आणि यवतमाळ जिल्हयातील बेंबळा येथे उपसा सिंचन योजना राबविण्याबाबत

(२) १३९४ (१३-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून उपसा सिंचन योजना प्रायोगिक स्तरावर राबविण्यात येत असून याकरिता बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्णा, पेनटाकळी, निम्न वर्धा आणि यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पाचा समावेश केला असून याबाबत प्रशासकीय पातळीवरील अभ्यास सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अभ्यास पूर्ण होऊन तसा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळांतर्गत खडकपुर्णा व पेनटाकळी प्रकल्प असून, खडकपुर्णा प्रकल्पावर सद्य:स्थितीत ७ उपसा सिंचन योजना कार्यान्वित असून त्यावरुन सिंचन सुरु आहे. पेनटाकळी प्रकल्पाची संपुर्ण सिंचन क्षमता निर्मिती झाली असल्याने या प्रकल्पावर नव्याने उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

वर्धा जिल्हयातील निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत आर्वी उपसा सिंचन योजना आणि यवतमाळ जिल्हयातील बेंबळा प्रकल्पांतर्गत डेहणी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पोवारीटोला (जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषदेच्या हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्यांबाबत

(३) १४०६ (११-०४-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोवारीटोला (जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषदेच्या हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळेच्या जीर्ण व मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यात जीव धोक्यात घालून विद्यार्थी ज्ञानार्जन करीत असल्याचे माहे जानेवारी,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने शाळेतील विद्यार्थ्यांना त्वरित अन्यत्र स्थलांतर करून या शाळेच्या दुरुस्तीचे काम तात्काळ सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०१-२०२१) : (१) नाही, हे खरे नाही.

तथापि, जीर्ण व मोडकळीस आलेल्या शाळेच्या वर्ग खोल्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वर्ग भरविण्यात येत नाहीत.

(२) होय.

दि.७.१.२०२० रोजी शाळेची पाहणी करण्यात आली आहे. सदर शाळा वर्गखोल्या दुरुस्तीसाठी समग्र शिक्षा अंतर्गत वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक सन २०२०-२१ या वर्षी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाबार्ड कर्जातून राज्यातील अपूर्ण जलसिंचन प्रकल्प पूर्ण करणेबाबत

(४) १६७८ (१५-०४-२०२०). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० मोठे, १८ मध्यम आणि २२ लघु असे ५२ जलसिंचन प्रकल्पांसाठी नाबार्ड कडून १५ हजार कोटींचे कर्ज काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयासाठी ३३८०, विदर्भासाठी ३८४७ तर उर्वरित महाराष्ट्रसाठी ७७७९ कोटी रुपये देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाबार्ड कर्जातून ५२ सिंचन प्रकल्प पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२२-१२-२०२०) : (१) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) व बळीराजा जलसंजीवनी योजना (BJSY) या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून ५२ बांध्कामधीन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी रु.१५ हजार कोटीचे कर्ज वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय दि. ७/८/२०१९ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतला आहे. याबाबत दि. ९/९/२०१९

रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(२) त्यानुसार मराठवाडयासाठी रु ३३८१ विदर्भासाठी रु. ३८४८ व उर्वरीत महाराष्ट्रासाठी रु. ७७७१.५२ कोटी प्रस्तावित आहेत.
(३) कर्ज घेण्यासाठी वित्तीय संस्था निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून काही वित्तीय संस्थाकडे शासन स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोअर दुधना कालव्याचे व चारीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(५) २१२६ (१५-०४-२०२०). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर दुधना कालव्याचे व चारीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पवनी (जि.भंडारा) येथील प्राचीन ऐतिहासिक स्मारकाचे नवीकरण व संग्रहालय निर्मिती बाबत

(६) २४५९ (०६-०४-२०२०). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि. भंडारा) येथिल प्राचीन ऐतिहासिक स्मारकाचे नवीकरण व संग्रहालयाची निर्मिती तसेच पर्यटन विकासामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे शासनाच्या पर्यटन विभागाकडे दिनांक २१ जुलै, २०१७ रोजी तसेच सन २०१८-२०१९ दरम्यान ऐतिहासिक पर्यटन स्थळाचा विकास करून विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रधान सचिव, पर्यटन विभाग, यांना निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार प्राचीन ऐतिहासिक स्थळांचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल व अंदाजपत्रक सादर करण्यासह विकास निधी उपलब्ध करून विकास आराखडा तयार करण्यासाठी संबंधित विभागाला निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२१-०१-२०२१) : (१) होय
(२) पवनी, जि. भंडारा येथे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांच्या अखत्यारीतील तीन राष्ट्रीय संरक्षित स्मारके १. किल्ला दिवार २. जगन्नाथ मंदिर स्थित प्राचीन टीला ३. हरदौला

का प्राचीन टीला आहेत. सदर स्मारकांच्या जमिनीचे मालकी या विभागाकडे नाही. प्रस्तुत प्रकरणी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडळ यांचे कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी बंद पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत

(७) ३७२१ (१६-०४-२०२०). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी तत्कालीन शासनाने शेतक-यांस शेती कामासाठी बंद पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याचे धोरण आखले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हयातील बोरी धरण व मांजरा धरणामधून शेतक-यांसाठी शेतीच्या कामासाठी बंद पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा योजना राबविण्याची लोकप्रतिनिधीनी लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणामधून शेतक-यांनी शेतीच्या कामासाठी बंद पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२२-०१-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.
बांधकामाधीन सिंचन प्रकल्पामध्ये पारंपारिक कालवे ऐवजी नलिका प्रणालीद्वारे पाण्याचे वितरण करण्याचे धोरण आखले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हयातील बोरी धरण व मांजरा धरणामधून शेतकऱ्यांसाठी शेतीच्या कामासाठी बंद पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत श्री. राणा जगजीतसिंह पाटील, मा. विधान सभा सदस्य, तुळजापूर यांनी दि.२३.०१.२०२० रोजी मा. मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांना निवेदन दिले आहे.
(३) मांजरा धरणाचे काम पूर्ण झाले असून प्रकल्पांच्या कालव्याच्या बहुतांश लांबीत अस्तरीकरण झालेले आहे. तसेच बोरी (कुरनुर) प्रकल्प पूर्ण झालेला आहे. पूर्ण झालेले कालवे बंद नलिकांमध्ये रुपांतरीत करण्याची तरतूद शासनाच्या धोरणामध्ये नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी (जि यवतमाळ) ग्रामीण रुग्णालयात ट्रामा केअर स्थापन करणेबाबत

(८) ३७७४ (१३-०४-२०२०). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी (जि यवतमाळ) तालुक्यात १११ गावे असून ग्रामीण रुग्णालयात तापसणीकरिता अंदाजे ४०० रुग्ण येत असतात त्यात एखादा अपघाताचा रुग्ण आल्यास त्याकरिता सदर रुग्णालयात कोणतीही व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी येथे अपघात झालेल्या रुग्णास ४५ किलोमीटर यवतमाळ येथे न्यावे लागते, त्यात रुग्ण गंभीर जखमी असल्यास यवतमाळ येथे पोहचेपर्यंत रुग्णाचा मृत्य होतो त्यामुळे आर्णी येथे ट्रामा केअर युनिट सेंटर असणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्णि येथे ट्रामा केअर स्थापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०७-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे नाही.
सद्यस्थितीत अपघात झाल्यास ग्रामीण रुग्णालय, आर्णी येथे उपचार करण्यात येतात आणि आवश्यकतेनूसार ४५ किलोमीटरवर असलेल्या वैद्यकिय महाविद्यालयात स्थलांतरीत करण्यात येते.
(३) दि.१८ सप्टेंबर २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये नविन ट्रॉमा केअर स्थापन करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे.सदर धोरणातील निकषानुसार आर्णि येथे ट्रॉमा केअर स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कळंब (जि. यवतमाळ) येथील बेंबळा कालव्याच्या आष्टी वितरीकेचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने शेती पिकाचे नुकसान होत असल्याबाबत

(९) ३७७७ (२४-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (जि. यवतमाळ) येथील बेबंळा कालवे विभागाने मुख्य कालव्यावर आष्टा वितरीका घेतली ही वितरीका माटेगांव, सावरगांव, चिचोली, टालेगांव शिवारातुन जाते तथापि वितरीकेचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याने माटेगांव शेत सर्व्हे क्रं १०३ शेतात पाणी झिरपुन शेतीपिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वितरीकेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे लोकप्रतिनिधींच्या प्रत्यक्ष पाहणीमध्ये निदर्शनास आल्यानंतर संबधित विभागाच्या अधिका-यांना निकृष्ट कामाच्या दुरूस्तीबाबत पत्र व्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वितरीकेचे पाणी झिरपुन शेतक-याच्या झालेल्या शेतीच्या नुकसानीचा मोबदला देण्यासह वितरीकेचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
सदरचे शेत हे कालव्याचे डाव्या भागाकडील लाभ क्षेत्रात आहे. आष्टा वितरीकेच्या डाव्या बाजूने शेतापर्यंत तिव्र उतार असून पाझर झालेल्या काही भागात कालवा पूर्ण भरावातून तर काही ठिकाणी खोदकामातून गेलेला आहे. कालव्याच्या पाझराचे भागात मउस्तराचे खाली Fissured Rock (तडे पडलेला खडक) असल्यामुळे त्यातून पाणी झिरपून शेतात पाणी जमा होत होते.

भरावामध्ये कि.मी. २ मधील सा.क्र.१५०० मी. १८३० मी. वरील व कि.मी. ४ मधील सा.क्र.३३६० मी. वरील भरावाचे काम संकल्पीत पातळी पर्यंत कंत्राटदारामार्फत नव्याने करण्यात आलेले आहे.
(३) संबंधीतांकडून यावर्षी शेतीच्या नुकसानीचा मोबदला मागणी केल्याचे निदर्शनास आले नाही. वितरिकेची तळ पातळी पासून बाजूची शेत जमीन १.५ ते १.७५ मी. अंतराने खाली आहे. वितरिकेच्या सा.क्र.११०० मी. ते १२८० मी. व १७७५ मी. ते १९०५ मी. एवढ्या लांबीत निवडक अस्तरिकरण करण्यात आलेले आहे. भरावाचे ठिकाणी १.५० मी. खोलीपर्यंत पाण्याचा पाझर काढून देण्यासाठी चर खोदून देण्यात आले होते. या चरांमध्ये पाझराचे पाणी दिसून येत नव्हते. परंतु बाजूचे शेतजमीनीचे पृष्ठभागावर पाण्याचा पाझर दिसून येत होता. त्यामुळे, सद्यःस्थितीत आष्टा वितरीकेच्या ज्याठिकाणी पाझर आहे तसेच इतर निवडक भागातील अस्तरीकरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाच्या दुरुस्तीला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(१०) ३९५२ (१६-०४-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीतील टेमघर धरणाच्या दुरुस्तीला सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने अल्पमुदती मधील कामे पूर्ण होण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ही मान्यता तात्काळ देण्याचे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.
तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार टेमघर धरणाची गळती प्रतिबंधक कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेपेक्षा जादा खर्च झाल्याने व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा अहवाल क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आला असून सदर प्रस्तावाची राज्य तांत्रिक सल्लगार समितीकडून छाननी सुरू आहे.
(२) अद्याप सदर प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(३) सदर प्रस्तावाची छाननी राज्य तांत्रिक सल्लागार समितीमार्फत प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड धरणाच्या कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला बाधित शेतक-यांना मिळण्याबाबत

(११) ३९६७ (११-०४-२०२०). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीवरील भुसंपादनाचे शिक्के काढून त्या परत कराव्यात अन्यथा भामा-आसखेड धरणाचे पाणी पुण्याला जाऊ देणार नाही असा इशारा खेड तालुक्यातील भामा आसखेड व चासकमान धरणाच्या प्रस्तावित कालव्यासाठी भूसंपादन झालेल्या गावातील बाधित शेतकऱ्यांनी दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाच्या कालव्यांची कामे पूर्ण झाले नाहीत व बाधितांच्या पुनर्वसनाबाबत योग्य कार्यवाही झालेली नाही तसेच अनेकांना भूसंपादनाचा मोबदला मिळालेला नाही अशी शेतकऱ्यांनी तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भामा आसखेड धरण प्रकल्पाच्या पुनर्वसन कामी अधिग्रहीत केलेल्या २१ गावातील शेतकऱ्यांच्या सातबारावरील कब्जेदार सदरी हक्काचे शिक्के तात्काळ रद्द करण्यात यावी या मागणीसाठी शेतकऱ्यांना कृष्णा खोरे विकास मंडळाच्या दिनांक १९ जून २०१७ च्या बैठकीत ठराव क्रमांक ९५ /९ नुसार कालवा रद्द करण्याचा ठराव करुन त्या अनुषंगाने शेतकऱ्याच्या जमिनीवरील असलेले कब्जेदार आणि इतर हक्कातील शिक्के काढण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शेतकरी (कुणबी) मराठा महासंघ यांनी दिनांक ०६/०१/२०२० रोजी केलेल्या निवेदनात भूसंपादनाचा मोबदला मिळालेला नाही अशी तक्रार केलेली दिसून येत नाही.

(३) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी नियामक मंडळाच्या ९५ वी बैठक दि. १९ जून, २०१७ मधील ठराव क्र.९५/९ अन्वये"भामा आसखेड प्रकल्पाचे उजवा व डावा कालवा रद्द करण्यास नियामक मंडळ शासनास शिफारस करीत आहे." असा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने महामंडळाकडून प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(४) सदर प्रस्तावावरील शासनाच्या शेऱ्याची पूर्तता महामंडळाकडे प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव सकपाळ (ता.भोकरदन, जि.जालना) येथे आरोग्य वर्धिनी केंद्र सुरू करणेबाबत

(१२) ३९८१ (२५-०३-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव सकपाळ (ता.भोकरदन, जि.जालना) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे नवीन धोरणानुसार, केंद्र सरकारच्या आयुष्यमान भारत योजनेतून राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत येत्या आर्थिक वर्षापासून आरोग्य वर्धिनी केंद्रात रूपांतर होणार असल्याचे जिल्हा प्रशासनामार्फत माहे जून २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्रात सांडपाणी व्यवस्थापन, अंतर्गत प्रतीक्षा कक्ष, प्रयोगशाळा, वैद्यकीय अधिकारी कक्ष, आंतररुग्ण कक्ष, औषध साठवणी भांडार कक्ष इत्यादीची दुरुस्ती प्राधान्याने करण्यात येणार आहे, एमबीबीएस डॉक्टरची नियुक्ती करण्यात येणार आहे, त्याचबरोबर आयुर्वेदीक, युनानी, होमिओपॅथी उपचार सुरू करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगांव सकपाळ आरोग्य वर्धिनी केंद्र सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर केंद्रांमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी (Community Health Officer) या पदावर आयुर्वेद/युनानी/B.Sc. (Nursing) पदवीधारक नियुक्त केले जाणार आहेत.

(३) डिसेंबर, २०१९ पासून आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

निळवंडे (ता. अकोले, जि. अहमदनगर) धरणाच्या कालव्यांची कामे पुर्ण करणेबाबत

(१३) ४०८७ (१६-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर व नाशिक जिल्ह्यातील अवर्षणग्रस्त भागासाठी महत्वपूर्ण असलेल्या सन १९९७ मध्ये मान्यता दिलेल्या निळवंडे प्रकल्पाच्या कालव्यांच्या कामासाठी केंद्रीय जल आयोगाने तांत्रिक मान्यता व गुंतवणूक मान्यता प्रस्तावास सन २०१९ मध्ये मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निळवंडे धरणाचे काम पूर्ण होऊनही कालव्यांची कामे प्रलंबित असल्याने दुष्काळी भागाला पाणी मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यांच्या कामासाठी नाबार्ड, साई संस्थान इत्यादी माध्यमातून निधी मंजूर करण्यात आला असताना कालव्यांच्या कामबाबात दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कालव्यांच्या कंत्राटदाराची मुदत संपल्याने कालव्यांच्या कामांच्या रकमेत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह उक्त कालव्याची कामे तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१) अंशत: खरे आहे,
उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता दि. १४/०७/१९७० रोजी प्रदान करण्यात आली आहे. केंद्रीय जल आयोगाने दि.१४/०६/२०१८ अन्वये रू.२२३२.६२ कोटी रुपयास तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तसेच दि.२५/०२/२०१९ रोजी रू.२२३२.६२ कोटी रकमेस गुंतवणुक मान्यता प्रदान केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचेमार्फत रु. ५०० कोटी इतका निधी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्यासाठी जलसंपदा विभागास "एक विशेष बाब " म्हणून उसनवार तत्वावर (बिनव्याजी परत करण्याच्या बोलीवर) विधी व न्याय विभागाने शासन निर्णय दि. ३०/११/१८ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. तथापि, याबाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. १५२/२०१८ दाखल करण्यात आलेली आहे सद्य:स्थितीत सदरहू प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
राज्य शासनाच्या उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदी मधून व नाबार्डच्या निधीतून धरण अनुषंगीक कामे, डावा मुख्य कालवा, उजवा मुख्य कालवा व शाखा कालव्यांची कामे प्रगतीत आहे.
(४) अंशत: खरे आहे.
क्षेत्रिय परिस्थिती विचारात घेता विधिवत प्रक्रियाव्दारे निविदा शर्ती नुसार मुदतवाढ देणेबाबत सक्षम स्तरावर निर्णय झाला आहे. त्यानुसार त्या प्रकरणी भाववाढ देय ठरते.
सदर प्रकल्पांतर्गत कालव्यांवरील कामासाठी एकूण निविदांची संख्या १७ असून त्या प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी १६ निविदांना मुदतवाढी दिलेल्या आहेत. तसेच १ निविदेस मुदतवाढ देण्याची सद्यस्थितीत आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
निळवंडे धरणाच्या उजवा कालवा कि.मी. १ ते ४० व डावा कालवा कि.मी. ० ते ३ साठी नाबार्ड-२४ अंतर्गत रु.१८९.३५ कोटी कर्ज सहाय्य मंजूर आहे.
तसेच कालव्यांच्या उर्वरीत कामांसाठी नाबार्ड-२६ अंतर्गत रु. ८२०.७२ कोटी कर्ज सहाय्याचा प्रस्ताव (शासन हिस्सा ४०.०९ कोटी/ नाबार्ड अर्थसहाय्य रु.७८०.६३ कोटी) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचे पत्र दि.१७/०८/२०२० अन्वये शासनास प्राप्त असून त्या अनुषंगाने उचित कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हयातील सामान्य रुग्णालयातील आयसीयू कक्षात तज्ञांची पदे रिक्त असल्याबाबत

(१४) ४६२९ (२५-०३-२०२०). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली सामान्य रुग्णालयामध्ये आयसीयू कक्षात तज्ञच उपलब्ध नसल्याने लाखो रुपयांची महागडी यंत्रे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयसीयू कक्ष बंद असल्याने दररोज दहा ते पंधरा रुग्णांना उपचारासाठी नांदेडला पाठवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील पाणी प्रश्न, वार्डातील अस्वच्छता, औषधांचा तुटवडा, अपुरी वैद्यकीय सेवा या गोष्टींच्याही तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे. तज्ञांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे. मात्र आयसीयूचा वापर सुरु आहे व यंत्रसामुग्री वापरात आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया येथील गंगाबाई रुग्णालयात प्रसुती करिता महिलांकडून होत असलेली अवैध वसुली

(१५) ४६७४ (२२-०३-२०२०). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाई गंगाबाई रुग्णालय गोंदिया येथे प्रसूतीकरिता येणाऱ्या महिलांकडून अवैधरित्या उपचाराकरिता पैसे वसुल करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अमित विलासराव देशमुख (१३-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हा परिषदेतंर्गत असलेल्या रस्त्यांची झालेली दुरवस्था

(१६) ५६३१ (१६-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हा परिषदेतंर्गत असलेल्या ५५ टक्के रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन रस्ते दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१४-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषदेस शासनाच्या तसेच जिल्हा परिषदेच्या विविध योजनांमधून एकूण रु.२३९१.१२ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याअंतर्गत १३७ कामे मंजूर आहेत.

सदर कामे प्रगतीपथावर असून मार्च २०२१ अखेर पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

साठवण तलाव अटलगव्हाण ते पिंप्री डांभुर्णी जोड कालव्याच्या प्रस्तावाबाबत

(१७) ५७६० (१६-०४-२०२०). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव (जि. जळगाव) तालुक्यातील साठवण तलाव अटलगव्हाण ते पिंप्री डांभुर्णी जोड कालव्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडे सादर करावा, सांडवा दुरुस्तीचे कामाचे अंदाजपत्रक करावे व खर्च अवशिष्ट कामे या शिर्षावर टाकावा असे निर्देश तत्कालिन जलसंपदा मंत्री, यांनी दिनांक ३ जून, २०१९ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्देशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२२-०१-२०२१) : (१) होय.
(२) शासन निर्णय क्र. संकीर्ण/२०१७/(१८७/१७)/लपा-१, दि. २३ ऑगष्ट, २०१७ नुसार सदरील नदी जोड प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
गिरणा उपखोऱ्यात पाणी उपलब्ध नाही.
साठवण तलाव अटलगव्हाण सांडवा दुरुस्तीची कामे कंत्राटदाराच्या खर्चाने पूर्ण केली जाणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील रुग्णालयांची संख्या एक हजार वरुन दोन हजार करण्याबाबतचा घेतलेला निर्णय

(१८) ५७७९ (२५-०३-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जास्तीत जास्त गोरगरीब रुग्णांना लाभ मिळवून देण्यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील रुग्णालयांची संख्या एक हजार वरुन दोन हजार करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी राज्यात आता प्रत्येक तालुक्यात एक रुग्णालय या योजनेत सहभागी करुन घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यात आली आहे काय, असल्यास, आतापर्यंत राज्यात किती व कोणत्या तालुक्यात उपरोक्त योजनेअंतर्गत नवीन रुग्णालय उभारण्यात आली आहेत,
(४) अद्याप या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील रुग्णालयांची संख्या फक्त एक हजार पर्यंत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(२) या योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी राज्यात प्रत्येक तालुक्यात २ रुग्णालये या प्रमाणे अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार १००० रुग्णालयापर्यंत वाढ करण्यात येणार आहे.
(३) आतापर्यंत राज्यात एकूण ३५८ तालुक्यापैकी २५४ तालुक्यात योजनेंतर्गत रुग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाबाबत

(१९) ५९९८ (१०-०४-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील निरा-देवधर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या उजव्या कालव्याच्या (कि.मी. १८ ते ४०) अस्तरीकरणास रु.७० कोटीचा निधी मंजूर करुन उपलब्ध करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्रावर शासनाने निर्णय घेऊन व निधीची तरतूद करुन सदरील कामासाठी रक्कम रुपये ७० कोटी मंजूर करुन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, मा.मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली सदर विषयासह इतर प्रकल्पांच्या विविध प्रलंबित कामासंदर्भात दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली.

त्याअनुषंगाने निरा देवधर प्रकल्पास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता रु.५०.०० कोटी एवढी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या पुरातत्व खात्यामधील रिक्त पदे भरण्याबाबत

(२०) ६०९७ (२५-०३-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड किल्ल्यांच्या संवर्धनाची जबाबदारी राज्याच्या पुरातत्व विभागाची असून सदर विभागात मंजूर पदे ३०० पैकी तब्बल १२८ पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण ३५० किल्ले असून या किल्ल्यांपैकी ४७ किल्ले हे राष्ट्र संरक्षीत स्मारके असून, सदर किल्ले केंद्र शासनाच्या पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित असून, ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आले असून, या सर्व किल्ल्यांचे रक्षण आणि जतन करण्याचे काम राज्याच्या पुरातत्व विभागाकडे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गड-किल्ल्यांचे शासत्रशुध्द पध्दतीने जतन-संवर्धनाच्या कामात रिक्त पदांचाही अडसर असून अनेक किल्ल्यांसाठी राखणदारांची कमतरता आहे, हे खरे आहे काय,

(४) राज्यातील वारसा (हेरिटेज) वास्तुमध्ये राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारितील ५१ किल्ल्यांचा समावेश असून, या वारसा वास्तुंच्या देखभालीसाठी सध्याचा कर्मचारी वर्ग अपूरा आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत निष्कर्ष काय आहे, त्यानुसार रिक्त पदे भरण्यासाठी तसेच गड किल्ल्याचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२१-०१-२०२१) : (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. या विभागाच्या अखत्यारीत ५१ किल्ले राज्य संरक्षित म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. या राज्य संरक्षित किल्ल्यांची जतन व रक्षण करण्याचे काम पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) या विभागाच्या दि. २०.०६.२०१९ च्या आदेशान्वये संचालनालयातील गट-क संवर्गातील २० पदे सरळसेवेने आणि गट-ड संवर्गातील ३० पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास मान्यता देण्यात

आली आहे.

गड-किल्ले संवर्धनाकरिता गड संवर्धन समितीची स्थापना केलेली असून या समितीच्या शिफारसीनुसार २८ किल्ल्यांची निवड करण्यात आलेली आहे. या किल्ल्यांच्या संवर्धनाची कामे प्रगतीपथावर आहेत.

पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात माता बालसंगोपन व प्रसुतीगृहात बाळंतपणासाठी आलेल्या महिलेचा व नवजात बालकाचा झालेला मृत्यु

(२१) ६१३७ (२५-०३-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात माता बालसंगोपन व प्रसुतीगृहात बाळंतपणासाठी आलेल्या महिलेचा व नवजात बालकाचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे का,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२२-०१-२०२१) : (१) हे अंशत:खरे आहे.

सदर महिला दि.१७ डिसेंबर, २०१९ रोजी पालघर येथील आरोग्य पथक (पालघर) येथे दाखल झाली असता तेथे दि.१८ डिसेंबर, २०१९ रोजी नवजात बालकाचा जन्म झाला. जन्म झालेल्या बाळाचा प्रतिसाद नसल्याने बाळाच्या तपासणी करीता बालरोग तज्ञ, ग्रामीण रुग्णालय पालघर यांना बोलविण्यात आले. त्यांनी तपासणी करुन बाळ उपजत मृत्यू असल्याचे घोषित केले. हिमोग्लोबिन प्रमाण कमी असल्याने बाळाच्या मातेला आरोग्य पथकातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सिल्वासा येथे संदर्भीत केले. तिथे घेऊन जात असताना रुग्णवाहिकेत मातेचा प्रतिसाद कमी झाला होता. सिल्वासा रुग्णालयात पोहचल्यानंतर तेथील डॉक्टरांनी मातेला मृत घोषित केले.

(२) व (३) सदर घटना आरोग्य पथक (पालघर) येथे घडलेली असल्याने व सदर पथक वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली काम करत असल्याने या प्रकरणी चौकशी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाद्वारे वैद्यकीय अधीक्षक, सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

मोर्शी (जि.अमरावती) येथे १५० खाटांचे रुग्णालय व रक्तपेढी सुरू करणेबाबत

(२२) ६३२१ (२५-०३-२०२०). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) येथे अद्ययावत सुविधा पुरवणारे शासकीय रुग्णालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मोर्शी येथील रुग्णालयामध्ये खाटांची संख्या वाढविणे तसेच विविध सुविधांसहित रक्तपेढी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मोर्शी तालुक्यात १५० खाटांचे रुग्णालय व रक्तपेढी सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०७-०१-२०२१) : (१) होय,हे खरे आहे.

(२) आणि (३) नाही. हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे रक्तपेढी सुरू करण्याबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही आहे.तसेच सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून प्राथमिक आरोग्य केंद्र,मोर्शीचे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयात करण्याची मागणी निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बाभुळगाव, कळंब, राळेगाव (जि यवतमाळ) येथील पाटबंधारे विभाग आणि बेंबळा प्रकल्पावर बंद पाणीवापर संस्था कार्यरत असल्याचे दाखविल्याबाबत

(२३) ६३८५ (१०-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव, कळंब, राळेगाव, (जि यवतमाळ) येथील बंद पाणीवापर संस्था अस्तित्वात नसताना पाटबंधारे प्रकल्प आणि बेंबळा प्रकल्प यांच्या स्तरावर कार्यरत असल्याचे दाखवित असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी वापर संस्थाचे सहकार विभागामार्फत आॅडीट करण्यात यावे असे आदेश असताना कोणत्याही पाणी वापर संस्थेचे ऑडीट करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणीवापर संस्था बंद असून पाटबंधारे आणि बेंबळा प्रकल्प विभागाने संस्था सुरू असल्याचे दाखविल्याने याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये पाणीवापर संस्था स्थापन होत असल्याने सहकार विभागामार्फत ऑडिट करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) बेंबळा प्रकल्पावरील सिंचनाकरीता एकूण १७५ पाणी वापर संस्था स्थापन करण्याचे नियोजित असून सद्यःस्थितीत १४२ पाणी वापर संस्था स्थापन झालेल्या आहेत व हस्तांतरणाची प्रक्रिया विभागा मार्फत सुरु आहे.

पूर्व विदर्भात हिवतापाने ५ जणांचा मृत्यू झाल्याबाबत

(२४) ६७२१ (१३-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील ६ जिल्हयात हिवतापाच्या आजाराने थैमान घातले असून माहे जानेवारी २०१९ ते माहे सप्टेंबर २०१९ या कालावधीत आजाराचे १ हजार ६८२ रुग्ण आढळले असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रुग्णांपैकी ५ जणांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या आजारावर नियंत्रण मिळवून त्याचे निर्मुलन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१४-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

पुर्व विदर्भातील जिल्हयांमध्ये माहे जानेवारी २०१९ ते माहे सप्टेंबर २०१९ या कालावधीतीत आढळून आलेल्या हिवताप आजार रुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा	लागण
नागपुर	८
नागपुर मनपा	१
वर्धा	४
भंडारा	६
गोंदिया	२१६
चंद्रपुर	३८
गडचिरोली	१४०९
एकुण	१६८२

(२) हे खरे आहे.

पुर्व विदर्भातील जिल्हयांमध्ये माहे जानेवारी २०१९ ते माहे सप्टेंबर २०१९ या कालावधीत हिवताप आजारामुळे झालेल्या मृत्युंची संख्या खालीलप्रमाणे -

जिल्हा	मृत्यू
नागपुर	१
वर्धा	०
भंडारा	०
गोंदिया	३
चंद्रपुर	०
गडचिरोली	१
एकुण	५

(३) पुर्व विदर्भासह राज्यात किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

(१) नियमित साथरोग सर्वेक्षण व निदान झालेल्या रुग्णांवर त्वरीत समुळ औषधोपचार

(२) हिवताप प्रभावी क्षेत्रामध्ये सर्वेक्षण नियमित व प्रभावी होणेसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची उपलब्धता.

(३) किटकजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

(४) रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा पुरवठा करण्यात आला आहे.

(५) निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा.

(६) दुर्गम भागामध्ये त्वरीत निदानासाठी रॅपीड डायग्नॉस्टिक टेस्ट किट्सचा पुरवठा.

(७) किटकजन्य आजारांसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन.

(८) अतिसंवेदनशिल गावांमध्ये किटकनाशकाची फवारणी.

(९) डासोत्पत्ती रोखण्यासाठी लोकसहभाग.

(१०) आंतरविभागीय समन्वय

(११) विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण

• हिवताप निदान व औषधोपचारासाठी जिल्ह्यातील सर्व प्रा.आ.केंद्र. व सर्व शासकिय रुग्णालयांमध्ये मोफत व्यवस्था आहे.

• उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/विभागीय/ राज्यस्तरीय अधिका-यांच्या भेटी.

• दरवर्षी २५ एप्रिल जागतिक हिवताप दिन व जुन महिना हिवताप विरोधी महिना म्हणून साजरा केला जातो.

• उद्रेकग्रस्त गावांमध्ये ग्रामसभेच्या माध्यमातुन जनजागृती

• स्थानिक केबल, वृत्तपत्राद्वारे जनतेला आवाहन करण्यात येते. तसेच हस्तपत्रिका वाटप, कोराडा दिवास पाळणे, मायकिंग द्वारे जनजागृती केली जाते.

स्थानिक लोकप्रतिनीधीशी समन्वयाच्या माध्यमातुन जनजागृती केली जाते.

राज्यात हिवतापाचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या गडचिरोली जिल्ह्यासाठी खालीलप्रमाणे विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

• गडचिरोली जिल्ह्यातील सर्व गावांचे रुग्ण

भाराच्या प्रमाणानुसार (API) नुसार अ, ब, क असे वर्गीकरण करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेत येत आहे.

• सर्वेक्षणासाठी अतिरिक्त हंगामी क्षेत्र कर्मचारी नियुक्त (९००० मनुष्यबळ दिवस)

• रक्तनमुने तपासणीसाठी हंगामी प्रयोगशाळा तंत्रज्ञ नियुक्त (१७५० मनुष्यबळ दिवस)

• वैयक्तिक संरक्षणासाठी सन २०१९ पर्यंत जिल्ह्यामध्ये ३,५५,९७२ किटकनाशक भारित मच्छरदाण्यांचे वाटप.

• संकलित रक्तनमुन्यांची २४ तासात तपासणी

• जनतेच्या सोयीनुसार कर्मचा-यांचे सर्वेक्षण वेळेत बदल.

• गडचिरोली जिल्ह्यासाठी डॉ.अभय बंग यांचे अध्यक्षतेखाली Gadchiroli Task Force समितीची स्थापना.

• पुर्व विदर्भातील १८५० अतिसंवेदनशिल गावांमध्ये २ फे-यांमध्ये किटकनाशक फवारणी (गडचिरोली-१४३१)
• पुर्व विदर्भातील ६ जिल्ह्यांमध्ये एकूण २०६५ गप्पी मासे पैदास केंद्रे असून त्यातुन एकुण १७८६० डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडण्यात आलेले आहेत. (गडचिरोली - गप्पी मासे पैदास केंद्र -५५४ डासोत्पती स्थाने -२७६१)
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आष्टी तालुक्याला उजनी धरणातून पाणी देण्याबाबत

(२५) ७३२९ (१६-०४-२०२०). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३, (ता. आष्टी, जि. बीड) या योजनेत आष्टी तालुक्यातील २७५४३ हे. क्षेत्रास उजनी धरणातून ५.६८ अ.घ.फु पाणी देण्याचे प्रस्तावित असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत या योजनेला फक्त १.६८ अ.घ.फु. पाणी मंजुर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उर्वरीत ४.०० अ.घ.फु पाणी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१) होय.
शासनाने दिनांक ०७/०७/२००९ च्या पत्रान्वये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या २३.६६ अ.घ.फु पाणी वापराच्या सुधारित जलनियोजनास मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या रूपये ४८४५.०५ कोटी रक्कमेच्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास दिनांक २७/०८/२००९ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार या प्रकल्पाची कामे दोन टप्यात करावयाचे असून प्रथम टप्पा ७ अ.घ.फु पाणी वापरासाठी व व्दितीय टप्पा १६.६६ अ.घ.फु पाणी वापरासाठी प्रस्तावित आहे.
त्यामध्ये आष्टी उपसा योजना क्र. ३ साठी उजनी जलाशयातून प्राप्त होणाऱ्या पाण्यापैकी ५.६८ अ.घ.फु पाणी वापर व २७५४३ हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावित आहे.
तथापि प्रथम टप्यासाठी आष्टी उपसा सिंचन योजना क्र. ३ साठी १.६८ अ.घ.फु पाणीवापर व ८१४७ हे. सिंचन क्षेत्र प्रस्तावित आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कृष्णा पाणी तंटा लवादाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या वाट्यास आलेल्या अतिरिक्त पाणी वापरास मान्यता मिळाल्यानंतर कृष्णा-भिमा स्थिरीकरण प्रकल्प कार्यान्वीत झाल्यास उर्वरित १६.६६ अ.घ.फु पाणी कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी उपलब्ध होऊ शकेल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

फाळेगाव (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील अधिग्रहीत न केलेल्या शेतक-याच्या शेतजमिनीमध्ये बेंबळा प्रकल्पाचे पाणी जमा होउन शेती पिकाचे नुकसान होत असल्याबाबत

(२६) ७६१२ (१६-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फाळेगाव (ता.बाभुळगाव, जि यवतमाळ) येथील श्री गोपाल गणपतराव बावनकर रा फाळेगाव आणि सुदाम महादेव डोलार, फाळेगाव, श्री.संजय ऐकनाथ शिंदे, कोल्ही यांचे शेत सर्वे क्र ५३, ५५, ११५, यांचे शेत बेंबंळा प्रकल्पाच्या बाजुला असल्याने प्रकल्पामध्ये पाणी साठी वाढल्यास शेतक-याच्या शेतात पाणी येऊन शेती पिकाचे नुकसान होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेंबळा प्रकल्प मध्ये शेतक-याच्या शेत जमीनी अधिग्रहीत केल्या परंतु काही जमीनी अधिग्रहीत केल्या नसल्याने त्या शेतजमीनीत बेंबळा प्रकल्पातील पाणीसाठयामध्ये वाढ झाल्यास शेतात पाणी येवून पिकाचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना शेतपिक नुकसान मोबदला देण्यात आला नसल्याने चौकशी करुन शेतक-यांना मोबदला देण्यासह तसेच जमिन अधिग्रहण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे आहे,

बेंबळा प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रा लगतच्या मौजा फाळेगांव येथील गट क्र. ५३ व ५५ व मौ. कोल्ही येथील गट क्र.११५ हे क्षेत्र प्रकल्पाच्या पूर्ण संचय पातळीचे लगत असल्याने प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा झाल्यानंतर उपरोक्त गटाचे बाजुस असलेल्या नाल्याच्या थोपीमुळे (Back Water) सदरचे शेतात पाण्याचा ओलावा काही काळ राहतो.

(२) हे खरे आहे.

(३) दि.०७/११/२०१९ च्या दरम्यान संबंधित शेतकरी यांचे शेती पिकाबाबत स्थळपाहणी करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या सुधारीत येवा अभ्यासानुसार पूर्ण संचय पातळीमधे बदल झाला असल्याने फेर सर्वेक्षण करण्यात आले आहे. यानुसार बुडीत क्षेत्रालगतचे सुटलेले क्षेत्र संपादित करण्याकरीताचा प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मैजे पाडळसरे (जि.जळगाव) येथील निम्न तापी प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२७) ९९९५ (०४-०६-२०२०). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.अनिल पाटील (अमळनेर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मैजे पाडळसरे (जि.जळगाव) येथील निम्न तापी प्रकल्प चोपडा मतदार क्षेत्रातील नागरिकांसाठी उपयुक्त प्रकल्प असून या तालुक्यातील १०५०० हे. क्षेत्र निम्न तापी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात येत असून या प्रकल्पासाठी २२५१ कोटी रुपयांची आवश्यकता असताना सन २०१९-२० मध्ये या प्रकल्पास फक्त रु.३२.५० कोटी इतकी अल्प निधीची तरतूद करण्यात आलेली

असल्याने निधी अभावी या प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना व बळीराजा जल संजिवनी योजना या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये १५ हजार कोटी इतके दिर्घमुदतीचे कर्ज घेण्यास शासनाने दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजी मान्यता दिली असुन त्यामधून पाडळसरे निम्न तापी प्रकल्पासाठी रुपये १५०० कोटी इतक्या रकमेची आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निम्न तापी प्रकल्पाचे काम प्रस्तंभाच्या संकल्पनेच्या अभावी गेल्या १२ वर्षापासून प्रलंबित असल्याने या प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यासाठी मा. जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मा.मंत्री महोदयांनी दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजीपर्यंत प्रकल्पाच्या प्रस्तंभाच्या संकल्पनेचा प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार प्रकल्पाच्या प्रस्तंभाच्या संकल्पनेचा प्रस्ताव सादर करण्यासह सदरहू प्रकल्पास निधी उपलब्ध करून तात्काळ काम पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०१-२०२१) : (१)अंशत: खरे आहे,
तथापि, सन २०१९-२० मध्ये प्रकल्पास वार्षिक आखणी मध्ये रू. ३२.५० कोटी तरतुद करण्यात आली आहे व त्यानुसार रू. १४.२५ कोटी निधी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार प्रकल्पांतर्गत सर्व घटकांचे (स्थापत्ये कामे, वक्राकार दरवाजे, भुसंपादन, पुर्नवसन व इतर) कामे निधीच्या उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
दि. ०९/०९/२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे PMKSY व BJSY या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरीत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु. १५००० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रकल्पांमध्ये निम्न तापी प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे.
(३) व (४) दि.२८ जानेवारी २०२० च्या बैठकीतील निर्गमित इतिवृत्तामध्ये तसे निर्देश दिलेले नाहीत. तथापि, प्रकल्पाच्या प्रस्तंभाच्या सुधारीत संकल्पनेच्या दिनांक १०/०७/२०२० च्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने काक्रापार उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रातील पाणी उपलब्ध झाल्यानंतर सदर पाणी वापरासाठी नियोजन करणे शक्य आहे का? याचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यास दि. २२/१०/२०२० च्या पत्रान्वये महामंडळास कळविण्यात आले आहे.
तसेच सदर प्रकल्पाचा अंतर्भाव दीर्घ मुदतीचे रू. १५००० कोटी कर्ज घेवून हाती घेण्यांत येणाऱ्या प्रकल्पाच्या यादीमध्ये करण्यात आला आहे. त्यानुसार निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि. ठाणे) येथील कै.बी.जी.छाया रुग्णालय शंभर खाटांचे करण्यासह डायलसीस व केमोथेरपी सेंटर सुरु करणेबाबत

(२८) १०७०७ (०३-०६-२०२०). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि. ठाणे) येथील कै. बी.जी. छाया उपजिल्हा रुग्णालय शंभर खाटांचे करणे तसेच डायलेसिस व केमोथेरपी सेंटर सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांच्याकडे दिनांक १४ जानेवारी २०२० रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयास दिनांक २१ मे, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला असून सद्यस्थितीत सदर रुग्णालयाची व कर्मचारी निवासस्थानाच्या इमारतीची दूरावस्था झाली असल्याने याठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करण्याकरिताचा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांचेमार्फत आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कै. बी.जी.छाया रुग्णालय शंभर खाटांचे करण्यासह डायलसीस व केमोथेरपी सेंटर सुरु करण्याबाबत तसेच सदर रुग्णालय कर्मचा-यांच्या निवासस्थानाची नविन इमारतीचे बांधकाम करण्याकरिताचा प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (२२-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) आयुक्तालय स्तरावर रुग्णालयाचे इमारतीचे बांधकाम व कर्मचारी निवासस्थानाचे बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडयांचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

धुळे शहरात असलेले जुने सरकारी रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणेबाबत

(२९) ११६११ (०९-०९-२०२०). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात असलेले जुने सरकारी रुग्णालय (Civil Hospital) १०० खाटां वरून २०० खाटांचा श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन केल्यास आरोग्य कर्मचा-यांची पदे वाढवण्यात येणार आहेत काय तसेच सध्या सुरु असलेल्या १०० खाटांच्या रुग्णालयासाठी सर्व संवर्गातील कर्मचा-यांची पदे पूर्ण क्षमतेने भरली आहेत काय,

(३) असल्यास, शासनाने सध्या सुरु असलेल्या रुग्णालयासाठी आवश्यक असलेली साधन सामुग्री, औषधे यासाठी निधी मंजूर केलेला आहे काय व त्यासंदर्भात हाफकिन इन्स्टीटयूटकडे साहित्याची व औषधांची मागणी केलेली आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणी नुसार हफकिन इन्स्टीटयूटकडून किती साधन सामुग्री व औषाधे रुग्णालयास पुरविण्यात आली आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (०७-०१-२०२१) : (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
मंजुर पदांपैकी वर्ग १ ते वर्ग ३ एकूण १३७ पदे मंजूर असून ८९ पदे भरलेली आहेत व ४८ पदे रिक्त आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) एकूण ९ प्रकारची साधन सामुग्री पुरविण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे येथील सोनवद धरणातील कालव्याची दुरुस्ती करुन खोलीकरण करणेबाबत

(३०) ११६८३ (११-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील पांझरा नदीतील पाण्यातून सोनवद धरण भरले जाते परंतु कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे पाणी वाहून जात असल्याने सदर कालव्याची दुरुस्ती करुन खोलीकरण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी शासनाकडे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोनवद धरणाचे खोलीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) स्थानिक शेतक-यांनी शासनाकडे माहे मे २०२० मध्ये वा त्या दरम्यान अशी मागणी केल्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाचे अभिलेखावरुन दिसून येत नाही.
(२) प्रश्न उद्वभवत नाही. तथापि, सन २०१९-२० मध्ये सोनवद फिडर कालव्याद्वारे सोनवद धरण १०० टक्के भरण्यात आले होते. त्यामुळे पांझरा नदीस आलेले पुराचे पाणी वाहून नेणा-या कालव्याची दुरस्ती न केल्यामुळे पाणी वाहून जाते हे खरे नाही. तसेच निधी उपलब्धतेनुसार सोनवद फिडर कालव्याच्या दुरुस्तीचे काम वेळोवेळी हाती घेण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्वभवत नाही.

कोकणातील प्राचीन कातळ शिल्पांच्या संवर्धनाबाबत

(३१) ११७०९ (१४-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जागतिक वारसा स्थळात समाविष्ट होऊ शकण्याची क्षमता असणाऱ्या आणि राज्यातील कलेचा आद्य पुरावा असणाऱ्या कोकणातील प्राचीन कातळशिल्पांच्या संवर्धन योजनेस दिनांक

२६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणातील प्रामुख्याने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात विविध ठिकाणी आढळून आलेली व प्राचीन मानवी संस्कृतीचा इतिहास उलगडणारी
कातळशिल्पे राज्य संरक्षित होण्यासाठी पुरातत्व विभागाकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या ठिकाणचे प्रस्ताव शासनाला प्राप्त झाले आहेत आणि या कातळशिल्पांच्या संवर्धनाची योजना काय आहे,

(४) असल्यास, तद्नुसार कातळशिल्पांच्या संवर्धनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (२१-०१-२०२१) : (१) व (२) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कातळशिल्पे संरक्षित करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(३) रत्नागिरी जिल्हयातील भगवतीनगर, उक्षी, देऊड, चवे, कापडगाव, देवीहसोळ, बारसू येथील दोन व वाडीरुंढे या पुरास्थळांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

या योजनेत कातळशिल्पांचे संवर्धन करणे, त्यांच्या भोवती संरक्षण भिंत बांधणे, माहिती फलक लावणे, मचाण/मनोरा बांधणे व पर्यटकांसाठी अन्य सुविधा उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.

(४) रत्नागिरी जिल्हयातील १० कातळशिल्पांचे राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्याबाबतचे प्रस्ताव पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाकडून सन २०१८ मध्ये प्राप्त झालेले आहेत. सदर कातळशिल्पे ही बहुतांश खाजगी मालकीच्या जमिनीमध्ये स्थित आहेत. या जमिनीच्या मालकी हक्कात अनेक सहधारकांची नावे आहेत. अशा सर्व सहधारकांची सहमती मिळविण्याचा प्रयत्न विभागाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील ॲस्टर आधार हॉस्पिटल, साई कार्ड या रुग्णालयांचा महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत समावेश करणेबाबत.

(३२) ११७२८ (१४-०९-२०२०). श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाच्या काळात कोरोना व्यतिरिक्त अन्य व्याधीग्रस्त रुग्णांच्या उपचाराची सोय व्हावी याकरिता शासनाने महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत राज्यातील सुमारे ५०० हून अधिक रुग्णालयांचा नव्याने समावेश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये प्रामुख्याने अतिदक्षता विभाग, पदव्युत्तर डॉक्टर कायम सेवेत असणे, व्हेंटिलेटर, ऑक्सिजन, ऑपरेशन थेटर, कॅन्टीन तसेच रोग निदानासाठी सिटीस्कॅन व
पॅथॉलॉजी लॅबची सोय असणे गरजेचे असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील ॲस्टर आधार हॉस्पिटल, साई कार्ड या रुग्णालयांचा शासनाने या योजनेतंर्गत नव्याने समावेश केलेल्या रुग्णालयांच्या यादीत समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापुरातील वैद्यकीय सेवेतील अत्यंत महत्त्वाचा रुग्णालयांना या यादीतून दूर ठेवण्यात आले असल्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ३१ मार्च, २०२० अखेरीस ४९२ रुग्णालये अंगीकृत होती. दिनांक ०१ एप्रिल, २०२० पासून राबविण्यात येणाऱ्या सुधारीत एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये आजपर्यंत एकूण ९८१ (२९९ शासकीय व ६८२ खाजगी) रुग्णालये अंगीकृत आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) ॲस्टर आधार हॉस्पिटल दिनांक ०१.१२.२०१३ रोजी व साई कार्ड रुग्णालय दिनांक ०९.०१.२०१४ रोजी योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात आले होते. दोन्ही रुग्णालयाविरुद्ध पैसे घेतल्याच्या तक्रारी असल्यामुळे दिनांक ०६.११.२०१८ रोजी सदर रुग्णालयांचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे.

साजिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा उजव्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत

(३३) ११८९५ (११-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजिवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भातसा उजव्या कालव्यातून शेती सिंचनासाठी ३० टक्के पाणीपुरवठा सुरु असताना गेल्या १० वर्षापासून या भातसा उजवा कालव्याची दुरुस्ती व साफसफाई न झाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातसा उजवा कालव्याची किमी ३३ पर्यंत मुख्य कालवा व निवडक वितरण व्यवस्थेची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजीपासून भातसा उजव्या कालव्यात पाणी सोडण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार भातसा उजवा कालव्याची दुरुस्ती व साफसफाई तात्काळ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१५-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे.

दरवर्षी कालव्याच्या साफसफाई व गाळ काढण्याचे काम पाखरण कार्यक्रमांतर्गत यांत्रिकी विभागाकडून करण्यात येते.

सन २०१८-१९ व सन २०१९-२० मध्ये भातसा उजवा कालवा व वितरण प्रणालीच्या दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

(२) खरे आहे. सन २०१९-२० मध्ये रब्बी हंगामासाठी दि.२०/१२/२०१९ पासून पाणी सोडण्यात आले होते.

(३) डिसेंबर, २०१८ मध्ये धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचेमार्फत कालव्यांची तपासणी करण्यात आली आहे. सदर संघटनेच्या प्राप्त अहवालानुसार भातसा उजवा कालव्याच्या आवश्यक असलेल्या दुरूस्ती कामांची अंदाजपत्रके तयार करून त्या कामांची निविदा प्रक्रियाही पूर्ण झालेली आहे.सदर दुरूस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील ४२ गावांना तुबची बबलेश्वर याजनेतून पाणी मिळण्याबाबत

(३४) १२०८५ (१४-०९-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील ४२ गावांचा म्हैसाळ योजनेत समावेश नसल्यामुळे या गावांना कर्नाटकातील तुबची बबलेश्वर या योजनेतून पाणी मिळावे यासाठी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कर्नाटक सरकारसमवेत चर्चा केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) होय. (२) होय.

(३) सन २०१९ मध्ये जत तालुक्यातील वंचित गावांना तुबची बबलेश्वर योजनेतून पाणी मिळणेसाठी कर्नाटक राज्यासोबत सामंज्यस करार करुन पाठविला होता. तथापि कर्नाटक राज्याने त्यास असमर्थतता दर्शविली होती. तथापि याबाबत दि. ०८/०७/२०२० रोजी मा.मंत्री, जलसंपदा महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली मा. मंत्री (जलसंपदा), कर्नाटक राज्य यांचे समवेत झालेल्या बैठकीत कर्नाटक राज्याच्या तुबची बबलेश्वर योजनेतून जत तालुक्यातील वंचित गावांस पाणी सोडणे बाबत सकारात्मक चर्चा झाली आहे. दोन्ही राज्यांच्या जलसंपदा अधिकाऱ्यांमार्फत संयुक्तरित्या तुबची बबलेश्वर योजनेतुन जत तालुक्यातील वंचित गावास पाणी देण्याबाबतची तांत्रिक शक्यता पडताळून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोयनेच्या अवजलाचा वापर सिंचन व पाणीपुरवठा करण्यासाठी विविध विभागांमार्फत सुरु असलेल्या अभ्यासाबाबत

(३५) १२१३४ (११-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील वाशिष्ठी नदीमध्ये कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर उपलब्ध

होणारे ६७.५० अ.घ.फुट पाणी सिंचन व बिगर सिंचनासाठी वापरात आणण्याच्यादृष्टीने विविध विभागामार्फत अभ्यास प्रगतीपथावर असून सदर अभ्यासाच्या निष्कर्षावरून प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मा. जलसंपदा मंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना अवजलाचा वापर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे जिल्हातील सिंचन क्षेत्र व पिण्यासाठी तसेच मुंबई शहराच्या पाणी पुरवठयासाठी प्रकल्प राबविण्याकरिता अभ्यास करण्यात येत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अभ्यास पूरण होऊन कोणते निष्कर्ष काढण्यात आले आहेत तसेच सदरहू अहवाल शासनाला कधी पर्यंत प्राप्त होणार आहे,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१८-०१-२०२१) : (१) सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील तारांकित प्रश्न क्र. १३८५ च्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्हयातील वशिष्ठी नदीमध्ये कोयना धरणातून वीज निर्मीतीनंतर उपलब्ध होणारे ६७.५ अ.घ.फू. पाणी सिंचन व बिगर सिंचन वापरात आणण्याच्या दृष्टीने विविध विभागामार्फत अभ्यास प्रगतिपथावर असून, सदर अभ्यासाच्या निष्कर्षावरुन प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेणेत येईल असे उत्तर विधानमंडळास देणेत आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कोयना अवजलाचा वापर याबाबतचा अभ्यास प्रगतीपथावर असून अभ्यास पूर्ण होण्यास किमान एक वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील शासकीय रुग्णालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

(३६) १२१७३ (१४-०९-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील बहुतांश भाग हा ग्रामिण व डोंगराळ भाग असल्याने तेथील शासकीय रुग्णालयामध्ये बी.एच.एम.एस., एम.बी.बी.एस., एम.डी इत्यादी उच्च शिक्षित व अनुभवी डॉक्टर्स काम करण्यास प्रतिसाद देत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्या डॉक्टरांना शासनातर्फे डोंगरी व ग्रामीण भागात काम करण्याकरिता इन्सेंटिव्ह देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे काय,

(३) तसेच, सद्यस्थित कोकणातील रुग्णालयांमध्ये रिक्त असलेली पदे भरणेबाबत शासनातर्फे काही नियोजन करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे अंशतः खरे आहे. शासकीय रुग्णालयामध्ये बीएचएमएसची पदे मंजुर नाहीत. कोकण विभागात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हया ५ जिल्हयांचा समावेश आहे. कोकणातील शासकीय रुग्णालयात विशेषज्ञ एम.डी. इत्यादी

उच्च शिक्षित डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

(२) राज्याच्या अतिदुर्गम, दुर्गम व ग्रामीण भागातील आरोग्य संस्थेमध्ये सेवा करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षेत (NEET PG) शासन निर्णय दि. १९.०३.२०१९ नुसार संस्थेच्या प्रकारानुसार गुणाधिक्य देण्यात येते. तसेच शासन निर्णय दि. २९.०५.२०२० अन्वये कंत्राटी व बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांच्या मानधनात रु.२०,००० इतकी वाढ करण्यात आली असुन, त्यानुसार आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे एमबीबीएस अर्हताधारक यांना रु. ८०,०००/- व विशेषज्ञ अर्हताधारक यांना रु. ९०,०००/- मासिक मानधन निश्चित करण्यात आले आहे.

(३) होय.

(४) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२३) संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच सरळसेवेची पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असुन, पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनस्तर एस-२०) संवर्गातील रिक्त पदांवर बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी व जिल्हास्तरीय समितीमार्फत कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात येतात. तसेच आयपीएचएस/एनएचएम मार्फत कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावरगांव (मेट) (ता.भोकर, जि.नांदेड) येथे शाळा व अंगणवाडीतील बालकांना कालबाह्य आयर्न,फॉलिक ॲसिड' चा डोस दिल्याबाबत

(३७) १२६२८ (१५-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगांव (मेट) (ता.भोकर, जि.नांदेड) येथे सशक्त विद्यार्थी अभियानातंर्गत शाळा व अंगणवाडीतील ७ बालकांना कालबाह्य 'आयर्न,फॉलिक ॲसिड' चा डोस दिनांक २५ नोव्हेबंर,२०१९ रोजी वा त्यासुमारास देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या अहवालानुसार 'सशक्त विद्यार्थी अभियानासाठी' दिनांक १९ ऑक्टोबंर, २०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र मोघाळी येथून सावरगांव (मेट) अंगणवाडीस २० बॉटल्स 'आयर्न,फॉलिक ॲसिड' देण्यात आल्या ज्यांची मुदत २०२० पर्यंत होती पण अंगणवाडीत एकूण २१ बॉटल सापडल्या त्यापैकी ३ बाटल्या कालबाह्य झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जर अंगणवाडीस २० बॉटल दिल्या असतील तर जादाची एक बॉटल धरुन तिन कालबाह्य बॉटल कश्या प्राप्त झाल्या व दोन बॉटल ज्यांची मुदत २०२० पर्यंत होती त्या कुठे आहेत,

(४) असल्यास, सामान्यत: ज्या कंपनीची औषधी आरोग्य विभागाकडून पुरविली जाते ती औषधे बाहेर मेडीकल दूकानात किंवा खरेदीसाठी उपलब्ध नसतात त्यामुळे अंगणवाडी सेविकेने आपल्या स्तरावर औषधांची अदलाबदल करण्याची शक्यता व तसे करण्याचे कारण स्पष्ट होऊ शकत नाही. वा शक्यताही वाटत नाही. हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास, संबंधित प्रकरणात जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी काय कारवाई केली,

(६) तसेच ज्या औषधी कंपनीकडून ही औषधे खरेदी केली गेली त्या कंपनीवर कांणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे

सशक्त विद्यार्थी अभियानासाठी दिनांक १९.१०.२०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, मोघाळी येथून सावरगाव (मेट) अंगणवाडीस आयर्न फॉलिक ॲसिडच्या २० बॉटल्स पाठविण्यात आल्या ज्यांची मुदत माहे फेब्रुवारी, मे व जुलै, २०२० पर्यंत होती. तसेच दिनांक ३१.०८.२०१८ रोजी LAV८०१५AL या बॅचमधून १८ बॉटल्स सदर अंगणवाडीस देण्यात आल्या होत्या, त्यापैकी ३ बॉटल्स वापरात न आल्याने शिल्लक राहिल्या होत्या. त्यांची मुदत एप्रिल, २०१९ होती. अशा एकूण २३ बॉटल्स होत्या.
(४) व (५) घटनेची माहिती मिळताच वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी तातडीने अंगणवाडीत जाऊन मुदतबाह्य औषध दिलेल्या बालकांची तपासणी केली. बालकांमध्ये आरोग्यविषयक गुंतागुंत नसल्याचे आढळून आले. तसेच चौकशी अहवालाअंती संबंधित अंगणवाडी सेविकेस यापुढे दक्षता घेण्याबाबत उपमुख्य कार्यकारी (म.बा.) यांच्यामार्फत सक्त ताकीद देण्यात आली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

सोनखास (ता.कळंब,जि.यवतमाळ) शिवारातील बेंबळा सोनखास लघु पाटाची दुरूस्ती करणेबाबत

(३८) १२७९८ (०९-०९-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनखास (ता.कळंब, जि.यवतमाळ) शिवारातील बेंबळाच्या सोनखास लघु कालव्याचे बांधकाम करण्यात आले परंतु देखभाल दुरूस्ती अभावी गावाजवळील सिमेंट पाईप तुटल्याने कालव्यात पाणी सोडल्यावर पाणी गावात, शेतक-यांच्या शेतात व रस्त्यावर येत असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत परिसरातील शेतक-यांनी बेंबळा प्रकल्प अधिकारी यांच्याकडे तक्रार केली असता संबंधीत विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नादुरूस्त लघुपाटाची दुरूस्ती करण्यासह संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे अंशत: खरे आहे, याबाबत दि. २६/०६/२०२० रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(२) नाही. सोनखास लघुपाटाची दुरुस्ती करुन मिळणे बाबतचे निवेदन दि. २६/०६/२०२० रोजी प्राप्त झालेले आहे, त्यानुसार स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे.

(३) सोनखास लघुपाटावरील सा.क्र. ६४० वरील syphon वरुन होणाऱ्या पाणंद रस्ता वाहतुकीमुळे क्षतीग्रस्त झालेला भाग दुरुस्त करण्याचे काम प्रापणसुची सन २०२०-२१ समाविष्ठ करण्यात आले आहे. यानुसार दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) विलंब झालेला नाही.

मेरा (ता.चिखली,जि.बुलढाणा) येथील भूसंपादन प्रकरणास मान्यता देण्याबाबत

(३९) १२९५७ (०९-०९-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा (ता.चिखली,जि.बुलढाणा) येथील भूसंपादन प्रकरण क्र.७०/२०१२-१३ उर्वरित गटांच्या भूसंपादनाचे प्रकरण सन २०१२-१३ मध्येच जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जून,२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिनांक २७/६/२०२० रोजी निवेदन सादर केले आहे. जिल्हाधिकारी बुलडाणा यांचेकडून सदर निवेदन उपविभागीय तथा भूसंपादन अधिकारी, बुलडाणा यांना सादर केले असून त्याची प्रत मा.लोकप्रतिनिधींना सुध्दा पाठविली आहे.

मौजे मेरा बु.॥ ता.चिखली, जि.बुलडाणा येथील खडकपुर्णा प्रकल्प उपसा सिंचन टप्पा क्र. ४ वरिल मेरा वितरिका क्र. १ च्या कामासाठी आवश्यक असलेल्या १६.८९ हेक्टर आर क्षेत्राचा सरळ खरेदी प्रस्ताव माहे डिसेंबर २०१८ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आला होता, त्यापैकी १४.५४ हेक्टर आर क्षेत्राचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजूर केला व त्याप्रमाणे १४.५४ हेक्टर आर क्षेत्राचा ५.९५ कोटी रूपयाचा मोबदला संबधितांस वाटप झालेला आहे. उर्वरित २.१८ हेक्टर आर खाजगी क्षेत्राचा सरळ खरेदी प्रस्ताव दिनांक ३०-०७-२०१९ रोजी उपविभागिय अधिकारी बुलडाणा यांना सादर करण्यात आला होता. २६ भुधारकांचा प्रस्ताव क्षेत्र २.१८ हेक्टर आर गट व ताबा बदल असल्याने आपसातील सहमती घेऊन दिनांक ३०-०७-२०१९ रोजी पुनःश्च सादर केलेला आहे. सदर प्रकरणी दिनांक ०२-०६-२०२० रोजी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे सरळ खरेदी संदर्भात बैठक झाली. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरण सरळखरेदी न करता नविन भुसंपादन कायद्यानुसार कलम ११ अन्वये करण्याचे आदेशीत केले आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरणी नविन भुसंपादन कायद्यानुसार कलम ११ अन्वये कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव उप विभागिय अधिकारी, बुलडाणा यांना सादर करण्यात आलेला आहे. उर्वरित ०.१७ हेक्टर आर क्षेत्राचा सरकारी गटाचा भुसंपादन प्रस्ताव मंजुर झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) २६ भूधारकांच्या ७/१२ नुसार मालकी हक्क व प्रत्यक्ष ताबा या मध्ये तफावत आहे. त्यामुळे सरळ खरेदी मंजुरीस अडचण येत आहे, त्यामुळे नवीन भूसंपादन कायद्यानुसार कलम ११ चा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत कोरोना संसर्गाच्या काळात खाजगी नर्सिंग होम रुग्णालये दवाखाने बंद ठेवण्यात आल्याबाबत

(४०) १३१०२ (१०-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत कोरोना संसर्गाच्य काळात अनेक खासगी नर्सिंग होम, रुग्णालये व दवाखाने बंद ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. राजेश टोपे (०८-०१-२०२१) : (१) मुंबईतील खाजगी नर्सिंग होम रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम, रुग्णालयाचे रजिस्ट्रेशन ऍक्ट १९४९ अंतर्गत बृहमुंबई महापालिकेच्या सार्वजिनक आरोग्य खात्यातर्फे नोंदणी करण्यात येते, मुंबई महापालिका क्षेत्रात १४१६ खाजगी नर्सिंग होम, रुग्णालये कार्यरत आहेत. कोरोना संसर्गाच्या काळात यापैकी १३७२ इतके नर्सिंग होम, रुग्णालये चालू आहेत. तसेच राज्यातील खाजगी नर्सिंग होम सुरु आहेत.

(२) बंद असणारी रुग्णालये तेथील खाजगी वैद्यकिय व्यवसायिक, वयोगृध्द झाल्याने अथवा इतर व्यक्तीगत अपरिहार्य कारणाने बंद असल्याने याबाबत कोणत्याही कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांच्या मागण्याबाबत

(४१) १३२१६ (१०-०९-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यात १९ हजार कर्मचारी, अधिकारी १५ वर्षांपासून कंत्राटी स्वरूपात काम करीत असून शासनसेवेत समायोजन करण्याचा निर्णय होऊनही त्याना शासनसेवेत समावून घेत नसल्यामुळे ५ जून पासून स्वसंरक्षण न करता कोविड क्षेत्रात व अन्यत्र काम केले जाईल असा इशारा कंत्राटी कर्मचारी व आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिला असून आपल्या मागण्यांचे लेखी निवेदन राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील अधिकारी/कर्मचारी यांचे नियमित शासन सेवेमध्ये समावेशन करण्याबाबत विधानसभा सदस्य बल्लारपूर यांनी मा. मुख्यमंत्री याना दिनांक १६ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमित शासन सेवेत अनुभव व शिक्षणाचे आधारे विनाशर्त समायोजन करावे, समायोजन होईपर्यंत व समायोजनेनंतर उर्वरित कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये मंजूर असलेल्या नवीन वेतन पद्धतीने निर्गमित आदेशापासून पूर्ण फरकासहित वेतन द्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करण्या-या कंत्राटी कर्मचा-यांच्य मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१३-०१-२०२१) : (१) हे खरे नाही. समायोजन करण्याचा निर्णय झालेला नाही. मागण्यांचे निवेदन दिले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) समायोजनाबाबत शासन निर्णय दिनांक ०८ मे, २०१८ अन्वये गठीत समितीने शिफारस केली आहे. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे स्तरावरून कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोविड प्रोत्साहन भत्त्याबाबत दिनांक ६.७.२०२० रोजी व केंद्र शासनाच्या सहमतीने वेतन सुसूत्रीकरण व वार्षिक वेतनवाढीबाबत दिनांक ५.१०.२०२० रोजी आरोग्य आयुक्तालयातुन आदेश निर्गमित करण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांच्या बदली व पदोन्नती बाबत कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोनाग्रस्त रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे महात्मा फुले जनआरोग्य योजनेस मुदतवाढ मिळण्याबाबत

(४२) १३२२६ (१०-०९-२०२०). श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षांत घेऊन शासनाने महात्मा फुले जनआरोग्य योजना राज्यातील सर्व जनतेसाठी लागू करण्याचा निर्णय दिनांक २३ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची मुदतवाढ ही दिनांक ३१ जुलै, २०२० पर्यतच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कोरोनाग्रस्त रुग्णांची दिवसेंदिवस वाढती संख्या तसेच यापुढे कोरोनासह जीवन व्यतित करण्याची निर्माण झालेली परिस्थिती पाहतां ही मुदत निदान दिनांक ३० नोव्हेंबर, २०२०पर्यंत वाढविण्यात यावी अशी राज्यातील जनतेकडून शासनाकडे मागणी करण्यात आली असल्याचे दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (११-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.
(२) (३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२० अन्वये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व जनतेसाठी दिनांक ३१ जुलै, २०२० अखेरपर्यंत लागू करण्यात आली होती. तद्नंतर दिनांक १८ ऑगस्ट, २०२० च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता दिनांक १ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाघेरी-मठखुर्द (ता.कणकवली,जि.सिंधूदूर्ग) ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कुळयाची वाडी (वाघेरीवाडी) ते वाघेरीगाव या रस्त्याची झालेली दुरवस्था

(४३) १३४३१ (११-०९-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघेरी-मठखुर्द (ता.कणकवली, जि.सिंधूदूर्ग) ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कुळयाची वाडी (वाघेरीवाडी) ते वाघेरीगाव या अंदाजे ३ कि.मी. अंतराच्या रस्त्याच्या खडीकरणाचे व डांबरीकरणाचे काम गेल्या कित्येक वर्षांपासून करण्यात आलेले नसल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी वारंवार पत्रव्यवहार व विनंती अर्ज केल्यानंतर त्यांनी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी यांचे सोबत ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व त्यांचे सहकारी यांना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाहणी करण्यासाठी पाठविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पाहणीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने या कामास विलंब करणा-या संबधितावर कारवाई करण्यासह सदरहू रस्त्याचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१४-०१-२०२१) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) वाघेरी कुळयाची वाडी ग्रामीण मार्ग क्र.१०५ असून त्याची लांबी ३.०० कि.मी.आहे.सा.क्र.१/७०० ते १/९५० रस्ता अस्तित्वात असून डांबरी आहे. तर ०/०० ते १/७०० व १/९५० ते ३/०० लांबी अस्तित्वात नाही. सदर रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत प्रस्तावित होता. तथापि, सदर रस्त्यासाठी खाजगी जमिन धारकांनी जागा उपलब्ध करुन देण्यास मनाई केल्यामुळे रस्ता होऊ शकला नाही.

सदर रस्ता तयार करण्यासाठी खाजगी जमिन धारकांकडून जागा उपलब्ध झाल्यास सदर रस्त्याचे काम शासनाच्या विविध योजनेतून निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हतनूर (ता.भुसावळ, जि. जळगांव) धरणाचे वाया जाणारे पाणी ओझरखेड तलावात सोडण्याबाबत

(४४) १३७७३ (११-०९-२०२०). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरताळ, (ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव) येथून जवळच असलेल्या भुसावळ, मुक्ताईनगर, बोदवड या तीन तालुक्यांसाठी पाणी पुरवठा करणारा ओझरखेड तलावात हतनूर धरणाचे वाया जाणारे पाणी सोडण्यात यावे अशी स्थानिक शेतक-यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर मागणीनुसार ओझरखेड तलावात हतनूर धरणाचे वाया जाणारे पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) मा.श्री.संजय सावकारे, विधानसभा सदस्य, भुसावळ मतदार संघ यांनी संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक २७/०७/२०२० रोजीच्या पत्रान्वये निवेदन दिलेले आहे.

(२) ओझरखेड तलावात आजमितीस २४ दलघमी पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे हतनूर धरणाचे पाणी उचलून ओझरखेड तलावात सोडण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि. ठाणे) येथील काही गावांत निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर उपाययोजना करणेबाबत

(४५) १४२८६ (०८-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) येथील डोळखांब पासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर ढाढरे गावात सन २००२ मध्ये लाघुपाटबंधारे विभागाने तलाव बांधल्यामुळे वाधाने, डोंगरवाडी, उंबरवाडी, नामपाडा, खरपत -१, खरपत -२, लाकूडपाडा आणि अन्य गावांना व शेतीला पाणी मिळाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोळखांब व ढाढरे गावापासून जवळच १७०० एकरमध्ये एक फार्महाऊस बांधले असून ढाढरे तलावाचे पाणी अडवून ते थेट फार्महाऊस पर्यंत नेण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर गावांना पाणीपुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०१-२०२१) : (१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात ढाढरे गावात सन २००२ मध्ये कोणतेही धरण बांधण्यात आलेले नाही. परंतु ढाढरे गावाचे पश्चिमेस शाई नदीवर शिरोशी ता, मुरबाड जि.ठाणे येथे सन २००८ मध्ये को.प.बंधारा बाधला आहे. त्याद्वारे खाजगी उपसा सिंचनाद्वारे शिरोशी, माळ व ढाढरे या गावातील ११६.६५ हेक्टर क्षेत्र लाभक्षेत्रात येत आहे.

(२) शिरोळी, माळ व ढाढरे या गावातील शेतकरी स्वखर्चाने उपसाद्वारे ११६.६५ हेक्टर एवढया क्षेत्रास शिरोशी को.प.बंधाऱ्यावरुन सिंचनासाठी पाणी उचलतात. फार्म हाऊस बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रामध्ये आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) मतदार क्षेत्रातील सिंचन प्रकल्पाची झालेली दुरवस्था

(४६) १४३५८ (०८-०९-२०२०). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) येथे ७ मध्यम प्रकल्प - मेहकरी, कडा, रूटी, तलवार, कांबळी, तालुका आष्टी व महासांगवी तालुका पाटोदा तसेच २७ लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व तलावांमधुन आजपर्यंत किती क्षेत्र ओलिताखाली येते,

(३) असल्यास, सदरचे सर्व तलाव साधारणतः सन १९५८ ते सन २००६ या कालावधीत बांधलेले असून कालवे अत्यंत नादुरुस्त आहेत, कुठेही अंतिम भागात पाणी जात नाही तसेच प्रत्यक्ष सिंचन गेल्या १० वर्षांत फक्त १० ते १५% झाल्याचे दिसते व सिंचन क्षेत्र कमी होत चालले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे सर्व तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साठलेला असल्याने तलावातील गाळ काढण्यासह कालव्याचे अस्तरीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (२०-०१-२०२१) : (१) होय हे खरे आहे,

आष्टी,पाटोदा,शिरुर (जि.बीड) येथे एकूण ८ मध्यम प्रकल्प आहेत. आष्टी तालुक्यामध्ये मेहकरी, कडा, रुटी, तलवार, कांबळी, कडी हे ६ प्रकल्प आहेत.महासांगवी तालुका पाटोदा येथे १ व सिंदफणा,तालुका शिरुर येथे १ असे एकूण ८ मध्यम प्रकल्प आहेत. तसेच आष्टी, पाटोदा, शिरुर या तालुक्यात २८ लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत असे एकूण ३६ प्रकल्प आहेत.

(२) सर्व ३६ सिंचन प्रकल्पाचे लाभक्षेत्र २४०८५ हेक्टर आहे.

(३) होय, अंशतः खरे आहे.

सदरचे तलाव १९३८ ते सन २००६ या कालावधीत बांधलेले आहेत. तसेच काही लघुसिंचन तलावाच्या पुच्छभागात काही कालवे नादुरुस्त असल्याने व काही ठिकाणी लाभधारकांच्या मागणी अभावी सिंचनाचे पाणी पोहचत नाही. दरवर्षी तलावात उपलब्ध होणा-या पाणीसाठयांनुसार व मागणी प्रमाणे सिंचन होत असून गेल्या १० वर्षातील जास्तीत जास्त प्रत्यक्ष सिंचीत क्षेत्र सन २०१७-१८ मध्ये ७०३९ हेक्टर (२९.२३%) एवढे आहे.

(४) ८ मध्यम प्रकल्प व २७ ल.पा. तलावांच्या बुडीत क्षेत्रामधून केंद्रपुरस्कृत पथदर्थी प्रकल्प योजनेमध्ये तसेच लोकसहभागाद्वारे, मग्रारोहयो, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत गाळ काढण्याचे काम व दुरुस्ती कामे करण्यात आलेली आहेत. तसेच दुरुस्ती,पुर्नस्थापना व नुतनीकरण अंतर्गत आणि यांत्रिकी मशिनरीद्वारे आवश्यकतेप्रमाणे गरजेच्या निवडक ठिकाणी कालवा दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहे. तसेच निवडक ठिकाणी कालवा दुरुस्ती व अस्तरीकरणाची कामे विशेष दुरुस्तीतंर्गत आवश्यकतेप्रमाणे प्रस्तावित करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नवघर (ता. वसई, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत सुसज्ज उपजिल्हा रूग्णालय उभारण्याबाबत.

(४७) १४४३६ (१५-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नवघर (ता. वसई जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या साधारणता ५८ गुंठे जागेत १०० खाटांचे सुसज्ज उपजिल्हा रूग्णालय उभारण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ९ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास मंजूरी देऊन ५ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप शासकीय उपजिल्हा रूग्णालयाचे कोणतेही काम सुरू झाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसईत १०० खाटांचे शासकीय उपजिल्हा रूग्णालय उभारण्यासाठी रूग्णालय प्रशासनास शासनाने निधी उपलब्ध करून दिलेला नसल्याने अद्याप रूग्णालय उभारण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार वसई तालुक्यातील वाढती लोकसंख्या पाहता येथील जनतेला आरोग्य सुविधा मिळणेबाबत गरजेचे असल्याने तात्काळ निधी उपलब्ध करून शासकीय रूग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती.?

श्री. राजेश टोपे (२२-०१-२०२१) : (१) हे खरे आहे.

(२) (३) व (४) मौजे नवघर (ता. वसई जि.पालघर) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित होते. सदर अंदाजपत्रक सद्याच्या दरसूचीवर आधारित तयार करुन सादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तलयास कळविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे. सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हयातील कोविड आरोग्य केंद्रात सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(४८) १४४४३ (१५-०९-२०२०). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात शासनामार्फत कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी किती कोविड आरोग्य केंद्र उभारली गेली आहेत व त्यावर किती खर्च झाला तसेच सदर कोविड आरोग्य केंद्र मधे दिनांक ३० जुलै २०२० रोजी पर्यंत किती रुग्ण दाखल झाले व त्यांना शासनामार्फत कोणत्या संस्थेकडून आहार सुविधा पुरविण्यात आली व या आहार सुविधेकरिता किती खर्च झाला,

(२) तसेच, पोशेरी (ता.वाडा, जि.पालघर) येथे कोरोनाग्रस्त रुगणांसाठी ३०० खाटांचे कोविड आरोग्य केंद्र उभारण्यात आले असून येथे कोरोना पॉझिटिव्ह रूग्ण व क्वारंटाइन केलेले रूग्ण अशा दोन्ही प्रकारच्या रूग्णांवर उपचार तथा सुरक्षात्मक उपाय म्हणून ठेवण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कोविड सेंटर मध्ये आलेले पॉझिटिव्ह रूग्ण व क्वारंटाईन केलेले रूग्ण यांचेकरिता एकच प्रसाधनगृह उपलब्ध असल्याने ज्यांना क्वारंटाईन करण्याकरिता या ठिकाणी आणण्यात आले होते त्यांनाही कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता असल्याचे तसेच अस्वच्छ प्रसाधनगृह व रूग्णांना सुरवातील देण्यात येणारे विविध औषधी काढे, दूध, खीर या बाबी कालांतराने रूग्णांना मिळत नाही अशा बाबी निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कोविड सेंटरच्या उभारणीकरिता आलेला खर्च, येथील रुग्णांना आवश्यक औषधोपचार, जेवण, चहा, अल्पोपहार देण्याकरिता केलेला खर्च तसेच येथील कामाचे नियोजन कोणामार्फत करण्यात येते याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार पोशेरी येथील कोविड केंद्रात आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासह याकडे दुर्लक्ष करण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (०८-०१-२०२१) : (१) पालघर जिल्हयात शासनामार्फत कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी कोविड निगा केंद्र-२२, कोविड समर्पित रुग्णालय-४, समर्पित कोविड आरोग्य केंद्र -५ इतकी कोविड सेंटर उभारली गेली आहेत. सदरील कोविड सेंटरमध्ये ३० जुलै,२०२० पर्यत कोविड निगा केंद्र-८०४४, कोविड समर्पित रुग्णालय -१२४२, समर्पित कोविड आरोग्य केंद्र-१४८० इतके रुग्ण कोरोना आजारावरील उपचारासाठी दाखल झाले होते. सदर रुग्णांना राजर्षी नागरी सहकारी सेवा संस्था, बोईसर यांचेकडून आहार पुरवठा करण्यात येतो. सदरील आहार पुरवठयासाठी रक्कम रु.३,४३,६५,२११/- इतका खर्च झालेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार कोविड सेंटर संस्था अधिग्रहण करुन रुग्णांना उपचारासाठी दाखल व उपचार करणे कामी अधिग्रहीत संस्था ताब्यात दिल्यानुसार रुग्णांना

आवश्यक औषोधोपचार, जेवण, चहा, अल्पोपहार देण्यात येतो. सदरील संस्थातील कामाचे नियोजन हे जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोगय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांचेकडून नेमणूक केलेल्या नोडल ऑफिसर यांचेकडून केले जात असून रुग्णांना चांगली आरोगय सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. याबाबत चौकशीचा प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई नर्सिंग होम ॲक्ट सन २०१८ नियमावलीबाबत

(४९) १४७०४ (१५-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई नर्सिंग होम ॲक्ट सन २०१८ मध्ये प्रस्तावित नियमावलीमध्ये शासनाने सुचवलेले निर्देश हे रुग्णहिताच्या दृष्टीने दिसत असले तरीही हा सगळा वाढीव बदलांचा भुर्दंड रुग्णांकडून अप्रत्यक्षपणे घेण्यात येईल अशी शक्यता वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावातील तरतुदींमुळे रुग्णांना भुर्दंड भरावा लागत असल्याने शासन याबाबत फेरविचार करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१४-०१-२०२१): (१) याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

महामंडळातील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी लागू करणेबाबत

(५०) २०२५४ (१२-१२-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट शासनाचे दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसुचनेनुसार शासकीय कर्मचा-यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ७ वा वेतन लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या सार्वजनिक उपक्रम अंतर्गत कार्यरत असलेल्या महामंडळातील कर्मचाऱ्यांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार राज्यातील ५५ महामंडळापैकी जी महामंडळे आर्थिक दृष्टया परिपूर्ण असून ७ वा वेतन आयोग लागू करण्यास परिपूर्ण आहेत अशा महामंडळांना ७ वा वेतन लागू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (११-०१-२०२१) : (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्य सार्वजनिक उपक्रमातील अधिकारी/ कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या धर्तीवर सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचे निकष ठरविणे हा धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.